# कार्यालय नगर परिषद वाडी, ता. व जिल्हा नागपूर

जा.क्र./नपवा/बां.वि./२३५२/२०१७
कार्यालय नगर परिषद वाडी,जिल्हा नागपूर.
दिनांक :– २०/०७/२०१७

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगरपालिका नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये.

## बांधकाम मंजुरी आदेश

युनिक कोड क्रं.

| वर्ष कोड | | | | जिल्हा कोड | | तालुका कोड | | | निर्धारण अधिकारी कोड | | निर्धारण अधिकाऱ्याने दिलेला प्रकरण क्रं (जा.क्रं.) | | | | बंधकामाचा टप्पा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

प्रती,

**श्री आनंद रविद्र पलांदुरकर, श्री अमोल रविद्र पलांदुरकर,**
**श्रा. वार्ड क्रं.– ६, तिरुपती को– ऑप हाऊसिंग सोसायटी,**
**वाडी**

**विषय :– वाणिज्यीक व निवासी मकान बांधकाम परवानगीबाबत**

**संदर्भ** :– आपला अर्ज दिनांक. २६/०९/२०१६

वरील विषयाचे अनुषंगाने संदर्भांकित अर्जानुसार वार्ड क्रं.– ६, मालमत्ता क्रं.– २५६ वरील (खाली प्लॉट वरील)/शेत सर्व्हे क्रं./खसरा क्र.– जुना २१४ व नविन १३ च्या तिरुपती को– ऑप हाऊसिंग सोसायटी,वाडी मधील सिटी सर्वे क्रं. ३१२५ चे जागेवर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ ४८८.८९८ चौ.मिटर रजिस्ट्रीनुसार व नियमीतीकरणानुसार ४७१.५४१ चौ.मी१) बेसमेंट – ३८.७९१ चौ.मि. (व्यावसायीक बांधकाम) २) तळ मजला – १२०.३२७ चौ.मि. (व्यावसायीक बांधकाम) ३) पहिला मजला– १६४.३३५ चौ.मि. (व्यावसायीक बांधकाम) ४) दुसरा मजला– १५५.२३८ चौ.मि. (निवासी बांधकाम) ४) तिसरा मजला– १५५.२३८ चौ.मि.(निवासी बांधकाम) **एकुण बांधकाम क्षेत्रफळ – ६३३.९२९ चौ.मिटर.** क्षेत्रात सोबतचे मंजुर नकाशाप्रमाणे **जोता लेव्हलपर्यंतचे वाणिज्यीक व निवासी** मकान बांधकामास खालील अटी व शर्तीला अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१) बांधकामाची मंजुरी हे आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन सदर एक वर्ष पर्यत वैध राहील.त्या नंतर स्वत: अर्ज करून नुतनीकरण करूण घ्यावे लागेल.

२) मंजुर नकाशानुसार फक्त जोता लेव्हलपर्यतच बांधकामास परवानगी याद्वारे देण्यांत येत आहे.इमारतीचे जोता बांधकाम नकाशाप्रमाणे झाल्यानंतर या कार्यालयास कळवावे.त्यानंतर प्रत्यक्ष मौका पाहणी करून मंजुर

नकाशानुसारच जोत्याचे बांधकाम झाले असल्यास उर्वरीत बांधकामास परवानगी देण्यात येईल. मंजुर नकाशाप्रमाणे जोता बांधकाम झाले नसल्यास निकषाप्रमाणे सुधारीत नकाशे सादर केल्याशिवाय पुढील बांधकामास परवानगी देण्यात येणार नाही, व केलेले बांधकाम अनधिकृत समजण्यात येवुन कायदेशीर फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

३) बांधकाम सोबतचे मंजुर नकाशाप्रमाणे **एकुण क्षेत्रफळ - ६३३.९२९ चौ.मिटर** क्षेत्रातच असावे. मंजुरी व्यतिरिक्त बांधकाम करू नये.जादाचे बांधकाम करावयाचे झाल्यास मंजुरी घेवुनच करावे, अन्यथा परवाानगी शिवाय अथवा परवानगी दिलेल्या पेक्षा जादा जागेत बांधकाम केल्यास महा.प्रादेशिक नगर रचना अधि.१९६६चे कलम ५२ व ५३ नुसार नगर परिषदेमार्फत कार्यवाही केले जाईल.

४) शेजाऱ्याचे जागेवर/रस्त्यावर/बोळ/गटार त्यावर अतिक्रमण होणार नाही.त्याची दक्षता घ्यावी,तसे बांधकाम पाडुन घ्यावे लागेल.

५) नकाशात दर्शविल्यप्रमााणे प्लॉटचे सभोवताल योग्य समास सोडुनच बांधकाम करावे.न.प.गल्ली/रस्तयाच्या दिशेने योग्य अंतर सोडुनच बांधकाम करावे.

६) आवर भिंत बांधकामास शेजाऱ्याचे/शासकीय जागेवर दारे,खिडक्या,गटार वा इतर ओपनिंग ठेवु नये.आवार भिंतीची उंची दिड मिटर पेक्षा वाढवु नये.

७) आपल्या घराचे सांडपाण्याची व बेंसमेंटमधील पाण्याची/पावसाळी पाण्याची रितसर व्यवस्था आपण करावी व त्यापासुन कुणास त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) बांधकाम मटेरीयलपासुन शेजारी किंवा रहदारीस त्रास होणार नाही याकरीता रस्त्यावर मटेरीयल राहणार नाही, याची काळजी घ्यावी अन्यथा न.प.मार्फत कधीही मटेरीयल जप्त करण्यात येईल.

९) आपणांकडुन सादर केलेल्या दस्तावेजावर परवानगी दिल्यानंतर कोणत्याही प्रकारचा जमीनीबाबत आपसी वादाचा आक्षेप आल्यास व वाद निर्माणा झाल्यास आपले सुरू असलेले काम बंद करावे लागेल आणि होणाऱ्या न्यायालयीन प्रकरण व इतरत्र बाबीस न.पा. जबाबदार राहणार नाही,आपण वैयक्तिक जबाबदार राहाल.

१०) आपले घराचे जोत्याचे बांधकाम (प्लींथ) जमीनीपासुन कमीतकमी २.५ फुट वर असलेच पाहीजे.

११) नियमीत बांधमाम भुकंपरोधक करण्याचे दृ टीने आपणांस बांधकाम चालु करण्यापुर्वी सक्षम स्थापत्य अभियंता कडुन भारतीय मानक संस्थेने प्रमाणीत केल्याप्रमाणे नकाशे व आराखडे सादर करणे बंधनकारक राहील,आणि तसेच आर.सी.सी. डिझायनर कडुन कॉलम, बीम व स्लॅबचे डीझाईन (भुकंपरोधक) करूनच सक्षम स्थापत्य अभियंताच्या देखरेखीखाली आर.सी. सी. स्लॅब व इतर बांधकाम पुर्ण करावे लागेल.

१२) सदहु बांधकाम चालु असतांना आपण वरील अट क्र. ९, १० व ११ नुसार कारवाई केल्याचे कळविल्यानंतर नगर पालिकेचे कनिष्ठ अभियंता हे जेव्हा जेव्हा कामास भेट देतील तेव्हा तेव्हा वरील प्रमाणे होत असलेल्या कामाची नोंदवही ठेवुन तशी नोंद घ्यावी. आणि त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार पुढील बांधकाम करणे बंधनकारक राहील.

१३) वरील प्रमाणे अटी व शर्तीची पुर्तता न केल्यास भुकंपाचेवेळी व कच्चे बांधकाम केल्यामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे व सदरील बांधकामामुळे दुर्घटना होवुन कोणतीही जिवीत किंवा वित्त हाणी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील.

१४) या वरील अटीचे उल्लंघन झाल्यास केलेले बांधकाम अवैध समजण्यात येईल,आणि आपणांस दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल. या करीता सर्व अटीचे पालन करण्याच्या शर्तीवरच आपणास बांधकाम परवानगी देण्यात आहे.

१५) शासनाचे आदेशानुसार बांधकाम करतांना फ्लाय ॲश विटांचा वापर करावा.

१६) छतावरील पावसाचे पाणी ( Rain Water Harvesting ) साठवणुकीची स्वतंत्र व्यवस्था करावी.

१७) महाराष्ट्र शासन,उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं. अपाऊ २०० न ७/प्र.क्रं.५९०/उर्जा ७ दि. ११/९/२००७ नुसार शासनाने सौर उर्जेवरील गरम पाण्याचे सयंत्र,स्वतंत्र स्वखर्चाने न.प.क्षेत्रातील नागरीकांना बंधनकारक केले आहे.तरी त्याप्रमाणे आपण कार्यवाही करावी.

वरील अटीचे पालन न केल्याचे दिसुन आल्यास दिलेली बांधकाम परवानगी ही रद्द करण्यात येईल.

सहपत्रः— बांधकाम मंजुरी नकाशाची प्रत.

मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी

**प्रतिलिपी :— १) कनिष्ठ अभियंता,नगर परिषद वाडी**

उपरोक्त दिलेली परवानगी श्री आनंद रविद्र पलांदुरकर, श्री अमोल रविद्र पलांदुरकर वार्ड क्रं.— ६, तिरुपती को — ऑप हाऊसिंग सोसायटी,वाडी यांनी सादर केलेल्या नकाशा व आराखडयानुसार सक्षम अभियंताच्या देखरेखीखाली भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या तरतुदीनुसार चांगल्याप्रतीचे साहित्य वापरून बांधकाम करीत असल्याबाबत दर पंधरा दिवसाला भेट देवुन खात्री करून घ्यावी.भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या तरतुदीनुसार बांधकाम होत नसल्यास संबधिताचे बांधकाम बंद करून पुनः मानक संस्थेने दिलेल्या तरतुदीनुसार जबाबदारीने दुरूस्ती करून घ्यावी.

**२) मुख्य कर संग्रहक.नगर परिषद वाडी**

नविन बांधकामाची प्रत्यक्ष तपासणी करून नियमानुसार नोद घेवुन कर आकारणीची कार्यवाही करावी.

कार्यालय नगर परिषद वाडी ता. जि. नागपूर

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी